22 SEP 2021 लोकमत
जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




शिवाजी विद्यापीठात मंगळवारी आदरांजली सभेच्या प्रारंभी सामाजिक कार्यकर्त्या डॉ. गेल ऑम्वेट यांच्या प्रतिमेस कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शेजारी डावीकडून प्रकाश पवार, विलास नांदवडेकर, राजन गवस, भारत पाटणकर, पी. एस. पाटील उपस्थित होते.

# सामाजिक चळवळींतील डॉ. गेल ऑम्वेट यांचे योगदान मौलिक

## शिवाजी विद्यापीठात मान्यवरांकडून आदरांजली

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** सामाजिक कार्यकर्त्या डॉ. गेल ऑम्वेट यांनी समाजशास्त्रीय संशोधनाच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांची सैद्धांतिक, चिकित्सक मांडणी करण्यासह सामाजिक चळवळीत दिलेले कृतीशील योगदान मौलिक स्वरुपाचे आहे. त्यांचे हे कार्य समकालीन सामाजिक चळवळीत कार्यरत असणाऱ्या प्रत्येकास मार्गदर्शक आहे. डॉ. ऑम्वेट यांच्या कार्याचा आदर्श घेऊन त्यांचा वसा आणि वारसा पुढे चालविणे आवश्यक आहे, असे मत शिवाजी विद्यापीठात आयोजित आदरांजली सभेत मंगळवारी मान्यवरांनी व्यक्त केले.

विद्यापीठाचे यशवंतराव चव्हाण अध्यासन आणि यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटतर्फे 'डॉ. गेल ऑम्वेट: सैद्धांतिक आकलन व योगदान' या विषयावर आदरांजली सभा घेण्यात आली. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, ज्येष्ठ विचारवंत डॉ. भारत पाटणकर, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर प्रमुख उपस्थित होते. गेल ऑम्वेट या कोणत्याही अवांतर अभिनिवेशाविना भारतीय ग्रामीण समाजजीवनाशी निष्ठेने आणि मनापासून एकजीव झाल्या. चळवळीचा पिंड कायम ठेवून तिचे सिद्धांतन करण्याचे कौशल्य त्यांना साधले होते. मानवी अस्तित्वासंबंधाने नवे सिद्धांत उभे करणे आणि पूर्णत: मानुष होणे हे त्यांचे जीवनध्येय होते, असे डॉ. भारत पाटणकर यांनी सांगितले. सैद्धांतिक मांडणी करणारे खूप असतात; पण, सिद्धांत उभे करणारे दिसत नाहीत. डॉ. गेल या अशा सिद्धांत उभे करणाऱ्यांपैकी होत्या. माती, पाणी, स्त्री आणि विठ्ठल-बुद्ध या चार पायांवर त्यांनी आपल्या सिद्धांताला सक्षमपणे उभे केले होते, असे ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी सांगितले. यावेळी डॉ. एस. एन. पवार, एस. एस. महाजन, पी. एस. कांबळे, भारती पाटील, रणधीर शिंदे, मेघा पानसरे, जगन कराडे यांनी मनोगते व्यक्त केली. डॉ. प्रकाश पवार यांनी प्रास्ताविक केले. अमोल मिणचेकर यांनी सूत्रसंचालन केले.

### स्मृती जपण्यासाठी विद्यापीठ कार्यरत

डॉ. गेल यांनी संशोधनाचा उपयोग सामाजिक चळवळींना अधिष्ठान देण्यासाठी करणे आणि सामाजिक चळवळींबाबतचे संशोधन पुन्हा पुढे नेणे, अशी दुहेरी जबाबदारी यशस्वीरित्या पेलली होती. विद्यापीठ परिवार त्यांच्या स्मृती जपण्यासाठी विविध माध्यमांतून कार्यरत राहील, अशी ग्वाही कुलगुरु डॉ. शिर्के यांनी दिली.

लोकमत

# जनसंपर्काचे कार्य खूप आव्हानात्मक

कोल्हापूर : नवमाध्यमांचा उदय आणि जनतेकडून त्याचा होत असलेला अधिक वापर यामुळे शासकीय जनसंपर्काचे कार्य खूप आव्हानात्मक बनले आहे, असे प्रतिपादन ठाणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी शुक्रवारी केले. शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन विभागातर्फे आयोजित 'शासकीय जनसंपर्क' या विषयावरील राज्यस्तरीय ऑनलाइन वेबिनारच्या पहिल्या सत्रात ते बोलत होते.

लोकमत

# बी.एस्सी. फॉरेन्सिक सायन्ससह १६ परीक्षांचे निकाल जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : बी.एस्सी. फॉरेन्सिक सायन्स (सत्र तीन आणि चार), सस्टेनेबल ॲग्रिकल्चरसह (सत्र दोन, तीन आणि चार) विविध १६ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे ऑनलाईन निकाल शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने मंगळवारी जाहीर केल्या. आतापर्यंत एकूण २६९ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत.

बी.एस्सी. एनव्हायरमेंटल सायन्स (एंटायर सेमिस्टर तीन व चार), सस्टेनेबल ॲग्रिकल्चर मॅनेजमेंट, बी. एस्सी. (सत्र पाच आणि सहा), सर्टिफिकेट कोर्स इन जर्मन लँग्वेज, सर्टिफिकेट कोर्स इन जापनीज लँग्वेज (सत्र एक आणि दोन) या अभ्यासक्रमांचा निकाल जाहीर झाला. बी. ए., बी. कॉम., एम. ए., एम. कॉम. या अभ्यासक्रमांची मंगळवारी पुनर्परीक्षा झाली. त्यासाठी एकूण ३१७७ जणांनी नोंदणी केली होती. त्यापैकी २३२७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. अद्याप ज्या विद्यार्थ्यांची परीक्षा सुरू झाली नाही, त्यांनी मॉक टेस्ट सत्वर द्यावी. त्यामुळे मुख्य परीक्षेत तांत्रिक अडचणी येणार नाहीत, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी केले आहे.

पुढारी

# डॉ. ऑम्वेट यांचे सामाजिक चळवळींतील योगदान मौलिक

## विद्यापीठात मान्यवरांकडून आदरांजली

**कोल्हापूर: पुढारी वृत्तसेवा**

डॉ. गेल ऑम्वेट यांनी समाजशास्त्रीय संशोधनाच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांची सैद्धांतिक, चिकित्सक मांडणी करण्याबरोबरच सामाजिक चळवळीत दिलेले कृतिशील योगदान मौलिक स्वरूपाचे आहे. डॉ. ऑम्वेट यांच्या कार्याचा आदर्श घेऊन त्यांचा वसा आणि वारसा पुढे चालविणे आवश्यक आहे, असे मत शिवाजी विद्यापीठात आयोजित डॉ. गेल ऑम्वेट आदरांजली सभेत मान्यवरांनी व्यक्त केले.

यशवंतराव चव्हाण अध्यासन व यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने 'डॉ. गेल ऑम्वेट : सैद्धांतिक आकलन व योगदान' या विषयावर सभा झाली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. भारत पाटणकर म्हणाले, गेल ऑम्वेट हाडाच्या सामाजिक कार्यकर्त्या असल्याने त्यांच्या सामाजिक संशोधनाला स्वाभाविक अधिष्ठान प्राप्त झाले. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मार्गाने जाऊन बहुविद्याशाखीय सामाजिक संशोधन करण्याची हातोटी त्यांनी आत्मसात केली होती.



शिवाजी विद्यापीठातून...

ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस म्हणाले, डॉ. गेल ऑम्वेट उत्तम संशोधक, सामाजिक कार्यकर्त्या होत्या. माती, पाणी, स्त्री आणि विठ्ठल-बुद्ध या चार पायांवर त्यांनी सिद्धांताला सक्षमपणे उभे केले होते.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठीय मंचावरून डॉ. गेल ऑम्वेट यांच्या कार्याचा वेध घेत असताना त्यांचे शैक्षणिक आणि संशोधकीय योगदान प्रकर्षाने अधोरेखित करणे आवश्यक आहे.

यावेळी डॉ. एस. एन. पवार, अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, डॉ. पी. एस. कांबळे, डॉ. भारती पाटील, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. मेघा पानसरे, डॉ. जगन कराडे यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. प्रकाश पवार यांनी प्रास्ताविक केले. अमोल मिणचेकर यांनी सूत्रसंचालन केले.

पुढारी

# सोनाली नवांगुळ यांचा विद्यापीठाकडून गौरव

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी येथील साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका सोनाली नवांगुळ यांचे त्यांच्या निवासस्थानी जाऊन विद्यापीठाच्या वतीने अभिनंदन केले. सोनाली नवांगुळ यांनी अनुवादित केलेल्या 'मध्यरात्रीनंतरचे तास' या कादंबरीला साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर झाला आहे. त्या निमित्ताने त्यांचा गौरव करण्यात आला. नवांगुळ यांचे साहित्यिक व सामाजिक कार्य आदर्शवत स्वरूपाचे असल्याचे गौरवोद्गार कुलगुरू डॉ. शिर्के यांनी काढले. शिवाजी विद्यापीठातर्फे त्यांनी पुष्प व ग्रंथभेट देऊन नवांगुळ यांचे अभिनंदन केले. याप्रसंगी त्यांच्यासमवेत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, ज्येष्ठ पत्रकार उदय कुलकर्णी होते.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाकडून 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार'

## कुटुंबीयांकडून सात लाखांचा निधी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मराठीतील दिवंगत कवी सतीश काळसेकर व ऋत्विज काळसेकर यांच्या नावे शिवाजी विद्यापीठाच्या वतीने दोन कवींना सन्मानित केले जाणार आहे. सतीश काळसेकर यांच्या वाङ्मयीन कार्याचे स्मरण म्हणून शिवाजी विद्यापीठाने दरवर्षी मराठीतील लक्षणीय काव्यलेखन करणाऱ्या कवीला पुरस्कार देण्यात यावा, अशी इच्छा सतीश काळसेकर यांच्या पत्नी सुप्रिया काळसेकर यांनी व्यक्त केली. त्यानुसार त्यांनी सात लाख रुपयांचा धनादेश कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे नुकताच सुपूर्द केला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह अन्य उपस्थित होते.

पुढारी

# विश्वनाथ गरुड यांचे उद्या व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने गुरुवार (दि. २३) रोजी दुपारी १२ वाजता पुणे येथील सोशल मीडियाचे तज्ज्ञ विश्वनाथ गरुड यांचे 'कोरोनानंतरचा डिजिटल मीडिया' या विषयावर गुगल मीटद्वारे व्याख्यान होणार आहे. गरुड यांना डिजिटल पत्रकारितेचा प्रदीर्घ अनुभव आहे. अनेक वृत्तपत्र आणि वृत्त वाहिन्यांमध्ये त्यांनी डिजिटल आवृत्तीचे काम सांभाळले आहे. त्यांनी डिजिटल पत्रकारिता, डिजिटल बातम्या आणि एसईओ या दोन ग्रंथांचे लेखन केले आहे. डिजिटल माध्यमात गरुड यांनी अनेक नवे प्रयोग केले आहेत. विद्यार्थी, संशोधक, पत्रकार आदींनी व्याख्यानमालेस उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 SEP 2021

पुढारी

# अल्झायमरला समजावून घेतल्यास धोके कमी : डॉ. पाटील

कोल्हापूर : ज्येष्ठ नागरिकांना अल्झायमरसारख्या अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. अल्झायमर समजून घेतल्यास ज्येष्ठांना व त्यांच्या कुटुंबाला यापासून होणारे धोके कमी करता येतील, असे प्रतिपादन डॉ. कृष्णा पाटील यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभाग व राजर्षी शाहू ज्येष्ठ नागरिक संघ कोल्हापूर यांच्या वतीने अल्झायमर दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी विभागाचे प्र. संचालक प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी डॉ. पांडुरंग पुजारी होते. डॉ. पाटील म्हणाले, हा आजार मेंदूशी निगडित असल्याने मेंदूची कार्ये लक्षात घेणे गरजेचे आहे. काही वेळा आपण काही गोष्टी विसरतो अशावेळी मेंदूचे व्यायाम करणे गरजेचे आहे. प्रास्तविक महेश चव्हाण यांनी केले. श्रीकांत अडिवरेकर यांनी आभार मानले. यावेळी आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे अतुल एतावडेकर, आर. एम. जाधव आदी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठामार्फत नावीन्यपूर्ण संकल्पनांना व्यासपीठ

**कोल्हापूर :** नवसंकल्पनांना संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शिवाजी विद्यापीठाच्या वतीने नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राची स्थापना करण्यात आली असून, इच्छुकांनी आपल्या संकल्पना अधिकृत संकेतस्थळावर ३० सप्टेंबरपर्यंत पाठवाव्यात, असे आवाहन केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांच्याकडून करण्यात येत आहे. संचालक देशमुख म्हणाले, या केंद्राच्या अंतर्गत एसयूके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाऊंडेशन या सेक्शन आठ कंपनी कायदा, २०१३ नुसार रीतसर नोंदणी करण्यात आली आहे. तुमच्या नावीन्यपूर्ण कल्पना ज्या टप्प्यावर (उदा. कल्पना, प्रक्रिया, नमुना) आहेत त्या आमच्यापर्यंत पोहोचवा. या केंद्रामार्फत आम्ही त्याला योग्य व्यासपीठ मिळेल याची खात्री आहे. तुमच्या नावीन्यपूर्ण कल्पनांचे अधिकार अबाधित राहतील व त्याची गोपनीयता सांभाळली जाणार आहे. सर्व सहभागी व्यक्तींना प्रमाणपत्र दिले जाईल तसेच काही दर्जेदार व निवडक प्रकल्पांना रोख बक्षीस दिले जाणार आहे. ज्या प्रभावी, कार्यक्षम कल्पना असतील अशा कल्पनांना मूर्त स्वरूप देण्यासाठी शिवाजी विद्यापीठ तांत्रिक साहाय्य प्रदान करणार आहे.

22 SEP 2021 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ऑम्वेट यांचे चळवळीत मौलिक योगदान

## मान्यवरांकडून आदरांजली; कार्याचा वारसा पुढे चालविणार

कोल्हापूर, ता. २१ : 'डॉ. गेल ऑम्वेट यांनी समाजशास्त्रीय संशोधनाच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांची सैद्धांतिक, चिकित्सक मांडणी करण्याबरोबर सामाजिक चळवळीत दिलेले कृतिशील योगदान मौलिक आहे, त्यांचे हे कार्य चळवळीतील प्रत्येकाला मार्गदर्शक आहे, डॉ. ऑम्वेट यांच्या कार्याचा आदर्श घेऊन त्यांचा वसा आणि वारसा पुढे चालविणे आवश्यक आहे,' असे मत शिवाजी विद्यापीठात झालेल्या डॉ. गेल ऑम्वेट आदरांजली सभेत मान्यवरांना व्यक्त केले.

यशवंतराव चव्हाण अध्यासन, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटतर्फे ''डॉ. गेल ऑम्वेट : सैध्दांतिक आकलन व योगदान'' यावर सभा झाली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. भारत पाटणकर उपस्थित होते. डॉ. शिर्के, डॉ. पाटील, डॉ. पाटणकर यांच्या हस्ते डॉ. ऑम्वेट यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन केले. डॉ.पाटणकर म्हणाले, ''गेल ऑम्वेट या कोणत्याही अवांतर अभिनिवेशाविना भारतीय ग्रामीण समाजजीवनाशी निष्ठेने आणि मनापासून एकजीव झाल्या. मूळच्याच हाडाच्या सामाजिक कार्यकर्त्या असल्याने त्यांच्या सामाजिक संशोधनाला स्वाभाविक अधिष्ठान प्राप्त झाले. तळागाळापर्यंत जाऊन चळवळीचा अभ्यास, संशोधनाची त्यांची विशिष्ट शैली होती. चळवळीचा पिंड कायम ठेवून तिचे सिद्धांतन करण्याचे कौशल्य त्यांना साधले होते. महात्मा फुले, डॉ. आंबेडकर यांच्या मार्गाने जाऊन बहुविद्याशाखीय सामाजिक संशोधन करण्याची हातोटी त्यांनी आत्मसात केली होती.''



### विद्यापीठ परिवार स्मृती जपणार : कुलगुरू

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, ''डॉ. ऑम्वेट या लौकिकार्थाने कोणत्याही शैक्षणिक व्यवस्थेत पूर्णवेळ कार्यरत नव्हत्या. मात्र, तरीही त्यांनी समाजशास्त्रीय संशोधनाच्या क्षेत्राला दिलेले योगदान अतुलनीय आहे. विद्यापीठ परिवार त्यांच्या स्मृती जपण्यासाठी कार्यरत राहील.''

डॉ. राजन गवस म्हणाले, ''डॉ. ऑम्वेट उत्तम संशोधक, सामाजिक कार्यकर्त्या होत्याच पण, वक्तृत्वावरही त्यांचे प्रभुत्व होते. माती, पाणी, स्त्री आणि विठ्ठल-बुद्ध या चार पायांवर त्यांनी सिद्धांताला सक्षमपणे उभे केले होते.'' डॉ. एस. एन. पवार, अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, डॉ. पी. एस. कांबळे, शारदाबाई अध्यासनाच्या संचालक डॉ. भारती पाटील, मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे, विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे, समाजशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. जगन कराडे यांनी मनोगत व्यक्त केले.

कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदी उपस्थित होते. अमोल मिणचेकर यांनी सूत्रसंचालन केले.

सकाळ

# जनसंपर्क कार्याचे मूल्यमापन आवश्यक : औदुंबर चव्हाण

## शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा

कोल्हापूर, ता. २१: शासकीय जनसंपर्क केवळ प्रेसनोट काढण्यापुरता मर्यादित नसून ती आता एक शास्त्रशुद्ध आणि अद्ययावत कार्यप्रणाली झाली आहे. त्यात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. लोकसहभागाला महत्त्व आहे. सतत मूल्यमापन करत राहून त्यानुसार बदल गरजेचे आहे, असे मत यूएनडीपी, दिल्ली येथील माहिती, शिक्षण आणि संवादतज्ज्ञ औदुंबर चव्हाण यांनी व्यक्त केले. शासकीय जनसंपर्क या विषयावर शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागातर्फे आयोजित वेबिनारचा समारोप झाला. चर्चासत्राच्या अखेरच्या सत्रात ते बोलत होते.

चव्हाण म्हणाले, 'जनसंवाद प्रक्रियेत प्रथम अपेक्षित, श्रोता गट निश्चित केला जातो. त्याला समजेल अशा भाषेत संदेश निर्माण करणे, तो योग्य माध्यमातून त्यांच्यापर्यंत पोहोचवणे. लोकांच्या प्रतिक्रिया जाणून घेणे. संवादाची परिणामकारकता जाणून घेण्यासाठी त्या प्रक्रियेचे मूल्यमापन करणे आणि नंतर आवश्यक त्या सुधारणा करणे या बाबींना अत्यंत महत्त्व आहे.'

सकाळच्या सत्रात महा-पारेषणचे मुंबई येथील मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद अवताडे यांनी आणि माहिती व जनसंपर्क संचलनालय, मुंबई येथील साहाय्यक निर्देशक निशिकांत तोडकर यांनी मार्गदर्शन केले. डॉ. अवताडे यांनी महा-पारेषणच्या कार्याची त्यांच्या गृहपत्राची माहिती दिली. तोडकर यांनी मुख्यमंत्री कार्यालयाच्या जनसंपर्क कामाची माहिती दिली. पत्रकारिता विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी प्रास्ताविक केले. संजय घोडावत विद्यापीठाच्या सहायक प्राध्यापक अनुराधा इनामदार, चंद्रशेखर वानखेडे यांनी सूत्रसंचालन केले.

22 SEP 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोकसहभागातून वनस्पती संवर्धनाचे विविध उपक्रम

**केंद्रीय पर्यावरण आणि वन मंत्रालयाकडून उद्यानाला २००७ मध्ये पश्चिम भारतातील लीड बोटॅनिकल गार्डन म्हणून मान्यता व वित्तीय सहाय्य मिळाले आणि प्रा. एस. आर. यादव आणि त्यांच्या सहकाऱ्यांना या वनस्पती उद्यानाच्या विकासासाठी आणि वनस्पतीसंवर्धनासाठी एक निश्चित दिशा मिळाली. पश्चिम घाटातील तसेच भारतातील विविध जंगलांना भेटी देत असताना त्या ठिकाणच्या वनस्पतींच्या बिया आणणे, त्यांना रीतसर ट्रीटमेंट देऊन त्या उगवणे-रोपे तयार करणे, इतर वनस्पती उद्यानाबरोबर वनस्पतींची देवाण-घेवाण करणे, वृक्ष लागवड करणे अशी विविध कामे जोमाने सुरू झाली. आज आपल्याला जगासमोर-देशासमोर आदर्श असणारे समृद्ध असे अग्रणी वनस्पती उद्यान पाहावयास मिळते.**

- डॉ. मकरंद मोहनराव ऐतवडे

## » शहराचे फुफ्फुस : अग्रणी वनस्पती उद्यान- भाग ३५

### आर्बोऱ्याटम ऑफ मेडिसीनल ट्रीज अर्थात औषधी वनस्पतींचे वृक्षालय :

या वृक्षालायात धावडा (Anogeissus latifolia), मेढशिंगी (Dolichandrone falcata), मोह (Madhuca latifolia), धूप (Vateria indica), गोरखचिंच, माकडलिंबू, बिलिंबी, हिंगणबेट, महारूख, सालई, गणेर, करमळ, पुत्रंजीवी, कुचला, खरशिंगी, बिवळा, अग्नीमन्थ, वावडिंग, कांटिकुम्बल, काळाकुडा, पांढरा कुडा इ. सारख्या १०० औषधी वृक्षांची पद्धतशीर लागवड केली आहे.

### आर्बोऱ्याटम ऑफ रेट ट्रीज अर्थात दुर्मिळ, प्रदेशनिष्ठ आणि संकटग्रस्त वनस्पतींचे वृक्षालय :

पश्चिम घाट आणि अंदमान-निकोबार बेटांवरील जवळ जवळ ६३ दुर्मिळ, प्रदेशनिष्ठ आणि संकटग्रस्त वृक्षांची लागवड या विभागात केलेली आहे. उदा. मँजीफेरा अंदमानिका (Mangifera andamanica), वाटिका चायनेन्सिस (Vatica chinensis), सायझिजियम त्रावनकोरिकम (Syzygium travancoricum), प्लाचोनिया अंदमानिका (Planchonia andamanica), आयलॅंथस मलबारीका (Ailanthus malabarica), बौहीनिया फोव्हिओल्याटा (Bauhinia foveolata), रानफणस, उंडी, तुपा, सुसरपाठी, सेंच्युरी पाम, चेरा, काकड, कोकम, रानजायफळ, चांदाडा, अंजन इ.

### ग्रूव्हज अर्थात विविध राईंचा विभाग

या विभागात आंब्याच्या राईमध्ये (Mango grove) आंब्याच्या ३५ स्थानिक प्रजातींची लागवड केली आहे. तसेच कोकमाच्या राईमध्ये (Garcinia grove) १० पेक्षा जास्त कोकमच्या प्रजाती एकत्रितपणे लागवड केल्या आहेत. याबरोबरच वडाच्या (Ficus groove) राईमध्ये जवळपास वडाच्या जातीतील कृष्णवडासारख्या १० विविध प्रजाती पहावयास मिळतात.

### इन्सेक्टीव्होरस प्लांट्स अर्थात कीटकभक्षी वनस्पतींचा विभाग

घटपर्णी(Nepenthes sp.), दवबिंदू (Drosera sp.), सरासिनिया (Sarracenias) आणि डायोनियास (Dionaeas) यांसारख्या कीटकभक्षी वनस्पती या विभागात काचपेटीमध्ये त्यांना पूरक अशा वातावरणात जतन करून ठेवल्या आहेत.



शिवाजी विद्यापीठातील अग्रणी वनस्पती उद्यान.

### क्लायमबर्स अर्थात लतावर्गीय वनस्पतींचा विभाग

पश्चिमघाटातील महत्वपूर्ण अशा २५ पेक्षा जास्त लतावर्गीय वनस्पतींची लागवड या उद्यानाच्या कुंपणाभोवती केलेली आहे. चिनोमॉर्फा फ्रॅग्रन्स (Chonemorpha fragrans), बौहीनिया फोनिका (Bauhinia phoenicea), थंबर्जीया मायसोरेन्स (Thunbergia mysorensis), म्युक्युना संजप्पी (Mucuna sanjappae) इ. वनस्पती या विभागात पहावयास मिळतात.

### नर्सरी ऑफ रेट प्लांट्स अर्थात संकटग्रस्त आणि प्रदेशनिष्ठ वनस्पतींचा रोपमळा

अग्रणी वनस्पती उद्यानात ४ रोपमळे आहेत. त्यांमध्ये स्थानिक, संकटग्रस्त आणि प्रदेशनिष्ठ अशा २३९ प्रजातींची २४,००० पेक्षा जास्त रोपे वाढविली आहेत. कॅनारीम स्ट्रिक्टम (Canarium strictum), डायसोझायलोन बायनेक्टरीफेरम (Dysoxylum binectariferum), होपीया पोंगा (Hopea ponga), ख्नेमा आटेन्युटा (Knema attenuata), मनिलखरा लिट्टोरीस (Manilkara littoralis), पोलियालथीया फ्रॅग्रन्स (Polyalthia fragrans), देवजांभूळ-सायझिजीयम लेटम (Syzygium laetum) इ.

महत्वपूर्ण प्रजातींची रोपे तयार केली आहेत.

### नर्सरी ऑफ मॅन्ग्रोव्ह अर्थात खारफुटी वनस्पतींचा रोपमळा

यात खारफुटी वनस्पतीच्या रोपांची पैदास केली जाते आणि ती रोपे ठराविक वयाची झाल्यानंतर त्यांच्या नैसर्गिक अधिवासात पुनर्स्थापित केली जातात. उदा. हेरिटेरा लिट्टोरीस (Heritiera littoralis), कांडेलिया कांडेल (Kandelia candel), रायझोफोरा म्यूक्रोन्याटा (Rhizophora mucronata), अविसिनिया मरिना (Avicennia marina) इ.

### नीलांबरी सभागृह

अग्रणी वनस्पती उद्यानात १५० लोकांच्या आसनक्षमतेचे, आधुनिक तंत्रज्ञानाने समृद्ध असे सभागृह आहे. या सभागृहाला वनस्पतीवरूनच नीलांबरी सभागृह असे नाव दिले आहे. हे सभागृह म्हणजे अग्रणी उद्यानाची महत्वाची मालमत्ता आहे. जैवविविधता-पर्यावरण जतन, संरक्षण आणि संवर्धन यासंबंधीचे अनेक महत्वपूर्ण लोकसहभाग असलेल्या विविध कार्यक्रमांचे आयोजन या सभागृहात केले जाते.

(समाप्त)

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाद्वारे नवांगुळ यांचा सत्कार



कोल्हापूर : सोनाली नवांगुळ यांना साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे.

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, मराठी विभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे यांनी सोमवारी लेखिका सोनाली नवांगुळ यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्याबद्दल कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते त्यांचा विद्यापीठाच्यावतीने सत्कार करण्यात आला.

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी भविष्यात भाषांतराचा प्रकल्प विद्यापीठाकडून राबवण्यात येत आहे. या प्रकल्पात सोनाली नवांगुळ यांनीही सहभाग द्यावा, असे आवाहन त्यांनी केले. नवांगुळ यांनीही विद्यापीठाच्या प्रकल्पात सहभाग देणार असल्याचे सांगितले. चर्चेदरम्यान

- कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते सत्कार
- नवांगुळ यांनी नवोपक्रमात सहभागी व्हावे : कुलगुरू

विद्यापीठातील प्रमुख वास्तू दिव्यांगांसाठी सोयीस्कर करणार असल्याची माहिती कुलगुरु डॉ. शिर्के यांनी दिली. विद्यापीठाच्या वास्तूंना भेट देऊन सोयींची पाहणी करून त्रुटी असल्यास सांगाव्या, त्यादृष्टीने बदल करता येतील, असे नवांगुळ यांना आवाहन केले. तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी पुरस्काराची घोषणा होताच तमीळ लेखिका सलमा यांचे आणि मराठी वाचकांना तमीळ लेखिकेच्या साहित्यकृतीची भाषांतराच्या माध्यमातून ओळख करुन दिल्याबद्दल सोनाली नवांगुळ यांचे अभिनंदन केले आहे.

22 SEP 2021

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विदेशी भाषांचा अभ्यासक्रमात समावेश करा

## डॉ. दिलीप चव्हाण यांचे प्रतिपादन : डॉ. मेघा पानसरेंच्या ग्रंथाचे डॉ. बर्वे यांच्या हस्ते प्रकाशन

प्रतिनिधी
कोल्हापूर

इंग्रजीखेरीज आणखी एखाद्या परकीय भाषेचा शालेय अभ्यासक्रमात समावेश केला पाहिजे. डॉ. मेघा पानसरे यांच्या पुस्तकात विदेशी भाषांमधील करिअरच्या संधींची माहिती आहे. विद्यार्थ्यांसाठी ते मार्गदर्शक ठरले आहे, असे गौरवोद्गार नांदेड येथील स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठातील इंग्रजी प्राध्यापक डॉ. दिलीप चव्हाण यांनी काढले.

शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे संपादित 'विदेशी भाषा : शिक्षण आणि करिअर" च्या ऑनलाईन प्रकाशन सोहळ्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. पुणे येथील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील वृत्तपत्रविद्या विभागप्रमुख डॉ. उज्ज्वला बर्वे यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.



डॉ. चव्हाण म्हणाले, भारताचे परकीय भाषाविषयक धोरण निश्चित होण्याची गरज आहे. देशातील लोकांचा परकीय भाषांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला पाहिजे. परकीय भाषांविषयी सामाजिक जाणिवा समृद्ध करण्यासाठी विद्यापीठाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. बर्वे म्हणाल्या, विद्यार्थ्याने ज्ञान व जाणिवेच्या कक्षा रुंदावण्यासाठी अतिरिक्त भाषा शिकायला हवी. भाषा संस्कृतीची द्वारे खुली करतात. त्यातून व्यक्तिमत्त्व विकसित होण्यास मदत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठ परिक्षेत्रात विदेशी भाषांच्या शैक्षणिक प्रसारामध्ये विदेशी भाषा विभागाने ५० वर्षांत मोठे योगदान दिले आहे. शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांपर्यंत विदेशी भाषा पोहोचवण्यासाठी हायस्कूलमधील शिक्षकांना प्रशिक्षित करण्यासाठी विभागाने पुढाकार घ्यावा. विद्यापीठातर्फे दर्जेदार पुस्तकांच्या अनुवादाचा प्रकल्प हाती घेण्यात येत आहे. त्यासाठी विदेशी भाषांच्या अनुवादकांना सामावून घ्यावे.

डॉ. मेघा पानसरे यांनी प्रास्ताविक केले. शीतल कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. प्रियांका माळकर यांनी आभार मानले.

तरूण भारत

# नवनिर्मितीतून 'शाश्वत विकास' प्रस्तावास मुदतवाढ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात नवोपक्रम, नवसंशोधन व सहचर्य केंद्राची स्थापना केली आहे. या केंद्रांतर्गत एसयुके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फौंडेशनची नोंदणी केली आहे. या केंद्रांतर्गत नाविण्यपूर्ण संकल्पनांना मूर्त स्वरूप देण्यासाठी इच्छुकांनी- विद्यापीठाला पाठवण्यासाठीच्या प्रस्तावास ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. तरी इच्छुकांनी केंद्राशी संपर्क साधावा अथवा sciil‡unishivaji.ac.in यावर संकल्पना पाठवाव्यात, असे आवाहन केंद्र संचालक डॉ. एम. एस. देशमुख यांनी केले आहे. शिवाजी विद्यापीठ नाविन्यपूर्ण संशोधकांना आमंत्रित करत आहे. अशा नवकल्पनांच्या संगोपनासाठी संधी देण्याचा विद्यापीठाचा मानस आहे. तरी इच्छुकांनी विद्यापीठाशी संपर्क साधावा.

तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठ पुनर्परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सुरू असलेली पुनर्परीक्षा सुरळीत पार पडली. ३१७७ पैकी २३२७ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. बी. ए., बी. कॉम., एम. ए., एम. कॉम. या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. तसेच मंडळवारी बी. एस्सी. फॉरेन्सीक सायन्स, बी. एस्सी. सस्टेनेबल ॲग्रीकल्चर मॅनेजमेंट, बी. एस्सी. सस्टेनेबल ॲग्रीकल्चरल, बी. एस्सी. एनव्हारमेंटल सायन्स, सर्टीफिकेट कोर्स इन जापनीज लँग्वेज, सर्टीफिकेट कोर्स इन जर्मन लँग्वेज यासह १६ विषयांचे निकाल जाहीर करण्यात आले. ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पुनर्परीक्षेसाठी मॉकटेस्ट दिलेली नाही त्यांनी मॉकटेस्ट द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे यांनी केले.

22 SEP 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ध्वनिप्रदूषणात यंदा दीड टक्के वाढ!

## शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभागाचा अहवाल

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर दोन वर्षापासून अनंत चतुर्दशीला गणेश विसर्जन मिरवणुकीवर बंदी घातली आहे. गणेश विसर्जनवेळी साऊंड सिस्टीम नसली तरी पारंपारिक वाद्यांचा कडकडाट आणि लोकांची गर्दी झाली होती. त्यामुळे गतवर्षीपेक्षा यंदा ध्वनिप्रदुषणात वाढ झाली आहे, असे शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभागाने केलेल्या ध्वनिमापन सर्वेक्षणात निदर्शनास आले आहे.

शहरातील पारंपरिक मार्गाऐवजी पर्यायी मार्गाने इराणी खणीकडे गणेश विसर्जन करण्याची व्यवस्था करण्यात आली होती. सार्वजनिक गणेश विसर्जनावेळी पापाची तिकटी, गंगावेश,



उत्तरेश्वर पेठ यासह अन्य ठिकाणी ध्वनिप्रदुषणात गतवर्षीपेक्षा यंदा एक ते दोन टक्क्यांनी वाढ झाल्याचे निदर्शनास आले. काही ठिकाणी गतवर्षीपेक्षा यंदा ध्वनिप्रदुषणात घट झाली आहे.

परंतु गेल्या पाच वर्षाची तुलना करता ध्वनिप्रदुषणात जवळपास २५ ते ३० टक्केंनी घट झाल्याचे निदर्शनास येते. यामध्ये फटाक्यांसोबत बाजारपेठांतील, वर्दळ, लाऊडस्पिकर, वाहनांच्या

- गणेश विसर्जन काळात ध्वनिप्रदुषणांची तपासणी
- गतवर्षीच्या तुलनेत वाढ झाल्याचे चित्र स्पष्ट
- कोरोना नियमावलीमुळे गर्दी कमी

आवाजाचा समावेश आहे. याबाबतचे सर्वेक्षण शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभागाने केले आहे. याचा तुलनात्मक अहवाल विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. पी. आर. भोसले, सी. एस. भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली विजय परीट, ऋतुराज पिंगळे, सात्विक शिंदे, मनोज गुरव यांनी तयार केला आहे.

### प्रदुषणाचा अहवाल

| झोन भाग | २०२० | २०२१ |
|---|---|---|
| सायलेंट झोन सीपीआर | ५५.९७ | ५६.०६ |
| जिल्हाधिकारी कार्यालत | ४५.६२ | ५५.०४ |
| शिवाजी युनिव्हर्सिटी | ४१.७३ | ३९.९० |
| **रेसीडेन्सीयल** | | |
| राजारामपुरी | ३९.४७ | ४०.१ |
| शिवाजी पेठ | ४६.६५ | ४४.०९ |
| मंगळवार पेठ | ३८.१७ | ४६.२० |
| ताराबाई पार्क | ४६.८७ | ४७.३० |
| **कमर्शियल** | | |
| मिरजकर तिकटी | ५१.७६ | ५४.०१ |
| महाव्दार रोड | ५४.०५ | ५२.३० |
| पापाची तिकटी | ५९.६४ | ६०.०२ |
| राजारामपुरी | ५१.०२ | ५२.०३ |
| लक्ष्मीपुरी | ४२.९३ | ५४.०८ |
| शाहुपुरी | ४२.०५ | ५३.०२ |
| **इंडस्ट्रीयल** | | |
| उद्यमनगर | ४५.१२ | ५६.५० |
| वाय. पी. पवारनगर | ४३.४५ | ५४.६० |

22 SEP 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जिल्ह्याचा कोरोना रिकव्हरी रेट ९७ टक्क्यांकडे


## दिवसभरात २ मृत्यू, ४८ नवे रुग्ण : ७६ कोरोनामुक्त

प्रतिनिधी
कोल्हापूर

जिल्ह्यात मंगळवारी २४ तासांत कोरोनाने दोघांचा मृत्यू झाला. दिवसभरात ४८ नवे रुग्ण आढळले तर ७६ जण कोरोनामुक्त झाले. सक्रीय रूग्णसंख्या ५९० आहे. दरम्यान, जिल्ह्याचा कोरोना रिकव्हरी रेट ९६.९१ टक्क्यांवर पोहोचला आहे. त्यामुळे पॉझिटिव्हीटी रेट ३ टक्क्यांखाली आला आहे.

मंगळवारी शाहूवाडी तालुक्यातील सोनवडे आणि कागल तालुक्यातील सावर्डे येथील एका व्यक्तीचा मृत्यू झाला. शहर आणि परजिल्ह्यातील कोरोना मृत्यू नोंद निरंक राहिली. आजपर्यंत बळींची संख्या ५७५९ झाली आहे. ग्रामीण भागातील ३ हजार ८३, नगरपालिका क्षेत्रात ८२६, शहरात १२४९ तर अन्य ६०१ आहेत. कोरोनामुक्तांची संख्या १ लाख ९९ हजार ४६० झाली आहे. गेल्या २४ तासांत आजरा १, भुदरगड १, चंदगड ०, गडहिंग्लज १, गगनबावडा २, हातकणंगले ३, कागल २, करवीर २, पन्हाळा १, राधानगरी ०, शाहूवाडी २, शिरोळ ३, नगरपालिका क्षेत्रात २, कोल्हापुरात २५ तर परजिल्ह्यातील तिघे नवे रूग्ण आढळले. आतापर्यंतची रुग्णसंख्या २ लाख ५ हजार ८०९ झाली आहे. चंदगड, राधानगरी तालुक्यात नवी रूग्ण संख्या नोंद शुन्य राहिली. सद्यस्थितीत शहरात ८ आणि ग्रामीण भागात २२० जण होम क्वरंटाईन आहेत.





## जिल्हाधिकाऱ्यांकडून ऑक्सिजन स्थितीचा आढावा



कोरोनाच्या संभाव्य तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांनी जिल्ह्यातील ऑक्सिजन स्थितीचा मंगळवारी आढावा घेतला. या संदर्भात कालबद्ध कार्यक्रम करुन हा विषय लवकर पूर्ण करा, असे निर्देश ही त्यांनी संबंधितांना दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात ऑक्सिजन वितरणाशी संबंधित समितीची बैठक आयोजित केली होती. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शंकरराव जाधव यांच्यासह विविध शासकिय विभागांचे अधिकारी व समिती सदस्य उपस्थित होते. ऑक्सिजनबाबतच्या कामात कोणतीही दिरंगाई नको, हे काम लवकरात लवकर पूर्ण करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी रेखावार यांनी दिले.

## शहरातील सर्व कोविड सेंटर बंद

- आयसोलेशनमध्येच होणार उपचार
- शहराची कोरोनामुक्तीकडे वाटचाल

**कोरोनामुक्त रुग्ण**

- शिवाजी विद्यापीठ डिओटी वसतिगृह.... ४०५२
- आयसोलेशन हॉस्पिटल........ १४५३
- शिवाजी विद्यापीठ वसतिगृह क्रमांक-३...१००८
- जैन बोर्डींग........ ११०५

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोरोना रुग्ण संख्या कमी झाल्याने शिवाजी विद्यापीठ डीओटी वसतिगृह येथील महापालिकेचे कोविड सेंटर मंगळवारी बंद करण्यात आले. यामुळे आता सर्व कोविड सेंटर बंद झाली असून एकमेव आयसोलेशन हॉस्पिटल सुरू आहे. कोविड रुग्णांवर येथेच उपचार केले जाणार आहेत.

शहरात कोरोनाची दुसरी लाट नियंत्रणात येत आहे. दोन महिन्यांपूर्वी आढळणारी रुग्ण संख्येच्या तुलनेत नवीन रुग्ण आढळून येण्याचे प्रमाणही कमी झाले आहे. तसेच रुग्ण कोरोनामुक्त होऊन घरी गेल्याने महापालिकेच्या १७ कोविड केअर सेंटर बंद केले आहेत. शिवाजी विद्यापीठ डिओटी वसतिगृह कोविड सेंटरही मंगळवारी बंद करण्यात आले. आता केवळ आयसोलशन हॉस्पिटलमध्ये कोरोना रुग्णांवर उपचार केले जात आहेत.

**दहा दिवसांत केवळ २१५ पॉझिटीव्ह**

शहरामध्ये जुन आणि जुलैमध्ये कोरोनाने कहर केला. रोज ३०० पेक्षा जास्त नवीन रूग्ण आढळून येत होते. आता साथ नियंत्रणात आली आहे. दहा दिवसांत २१५ पॉझिटीव्ह रुग्ण आढळले आहेत. यामध्ये मंगळवारी २५ रुग्णांचा समावेश आहे.

**सेंटरमधून ११ हजार रुग्ण कोरोनामुक्त**

कोल्हापूर महापालिका आणि स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून शहरामध्ये कोविड सेंटर सुरू करण्यात आली. मोफत उपचारमुळे गोरगरीबांना सेंटर आधार ठरली. ११ हजार रुग्ण येथून उपचार घेऊन कोरोनामुक्त झाली आहेत.